| MHRG140010952024 | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | ०२.०७.२०२४ |
| | नोंदणी तारीख | ०२.०७.२०२४ |
| | न्यायनिर्णयाची तारीख | १२.०३.२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०१ ०८ १० |

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २ उरण, ता. उरण, जि. रायगड यांच्या न्यायालयात**

समक्ष :– संतोष पी. वानखडे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
तारीख : १२/०३/२०२६

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६२८/२०२४** **निशाणी क्र. १२ च्या पुढे**

**(गुन्हा क्र. २०७/२०२४, अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८–क, सह कलम २७ पोलीस ठाणे, उरण, ता. उरण, जि. रायगड).**

| | | | |
|---|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | :– | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत, पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, उरण,<br>ता. उरण, जि. रायगड |
| **प्रतिनिधीत्व** | :– | | **श्रीमती. शितल पवार**<br>सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | :– | | **अनारुल जाफर अली,**<br>वय – २४ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. बोरी, ता. उरण, जि. रायगड. |
| **प्रतिनिधीत्व** | :– | | आरोपी तर्फे विधीज्ञ – **श्री. अनुराग ठाकुर** |

**भाग 'ब'**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | १९.०४.२०२४ |

| | | |
|---|---|---|
| प्रथमखबरची तारीख | :- | २०.०४.२०२४ |
| दोषारोप दाखल तारीख | :- | ०२.०७.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | :- | १४.०७.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचे तारीख | :- | २६.०९.२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | :- | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | :- | १२.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, असल्यास | :- | नाही |

-

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | ठेवलेला दोषारोप | शिक्षा ठोठावण्यात आले किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनारुल जाफर अली | --- | ०५.०८.२०२४ | अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८–क, सह कलम २७ अन्वये | निर्दोष सोडले | नाही | नाही |

### भाग 'क'

## अभियोगपक्ष /बचाव /न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष :–**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| पी.डब्ल्यु.१ | शशीकांत चंद्रकांत घरत | फिर्यादी |
| पी.डब्ल्यु.२ | चंद्रहार संभाजीराव पाटील | साक्षीदार |
| पी.डब्ल्यु.३ | रुपेश विश्वनाथ पाटील | साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असल्यास:–**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| –––– | ––– | ––– |

**क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास:–**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| --- | --- | --- |

-

**अभियोगपक्ष /बचाव /न्यायालयाचे निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोगपक्षाचे निशाणी क्रमांक :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | पि.१/पि.डब्लु. १ | फिर्याद |
| २. | पि.२/पि.डब्लु. १ | प्रथम खबर |
| ३. | पि.३/पि.डब्लु.२ | पंचनामा |

-

ब. बचावपक्षाचे निशाणी क्रमांक :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

_

क. न्यायालयाचे निशाणी क्रमांक :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

ड. भौतिक वस्तु :–

| अ.क्र. | भौतिक वस्तुचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**न्या य नि र्ण य**

**(दिनांक १२ मार्च २०२६ रोजी घोषीत)**

१. आरोपी अनारूल जाफर अली याच्याविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायदा (NDPS Act) १९८५ चे कलम ८(क) सह २७ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांबाबत संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

**प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की,**

२. फिर्यादी पो.हवा. शशिकांत घरत व पो.उप.नि. चंद्रहार पाटील, पो.हवा. रुपेश पाटील हे गस्तीवर असताना त्यांना बातमी मिळाली की एक इसम गांजा ओढत आहे. त्यांनी पंचांसमक्ष छापा टाकला असता आरोपी गांजा सदृश्य पदार्थ सिगारेटमध्ये भरून ओढत असल्याचे दिसले. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे गांजाची पुडी, दोन सिगारेट व माचीसची डबी मिळाली. सदर मुद्देमाल पंचांसमक्ष जागीच नष्ट करण्यात आला. आरोपीला वैद्यकीय तपासणीसाठी इंदिरा गांधी रुग्णालय येथे पाठवून फिर्याद दाखल

करण्यात आली. दाखल केलेल्या फिर्यादवरुन पोलीस ठाणे उरण येथे गुन्हा नोंद करण्यात आला. तपास अधिकारी यांनी तपास पुर्ण करुन दोषारोप पत्र दाखल केले.

३. आरोपी न्यायालयात हजर झाल्यावर दोषारोप निश्चित करण्यात आला. आरोपीने गुन्हा नाकबूल करून संपरीक्षेची मागणी केली.

४. अभियोग पक्षाने आपला खटला सिद्ध करण्यासाठी एकूण ३ साक्षीदार तपासले. त्याआधारे खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावर माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे आहेत:

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, आरोपीने नमूद वेळी व ठिकाणी गांजाचे सेवन केले? | नाही |
| २. | अंतिम आदेश? | आरोपीची निर्दोष मुक्तता. |

## <u>**का र ण मि मां सा**</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करीता :–</u>**

५. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांचे अवलोकन केले असता, प्रमुख साक्षीदारांनी उलटतपासणीत अत्यंत महत्त्वाच्या बाबी मान्य केल्या आहेत. सा.क्र.२ पो.उप.नि. पाटील यांनी मान्य केले आहे की जप्त केलेला मुद्देमाल त्यांनी वरिष्ठांच्या किंवा दंडाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय घटनास्थळीच नष्ट केला. अंमली पदार्थ कायद्यातील कलम ५२अ नुसार जप्त केलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट दंडाधिकाऱ्यांसमोर यादी करून व नमुने काढून करणे बंधनकारक आहे. जागेवरच मुद्देमाल नष्ट केल्याने न्यायालयात कोणताही मुद्देमाल (Physical Evidence) सादर करण्यात आलेला नाही. तसेच तो पदार्थ 'गांजा'च होता हे सिद्ध करण्यासाठी कोणताही रासायनिक विश्लेषकाचा (CA) अहवाल न्यायालयात दाखल नाही.

६. शिवाय, आरोपीने गांजाचे सेवन केले होते हे सिद्ध करण्यासाठी वैद्यकीय तपासणी करण्यात आली, परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रक्ताचे किंवा लघवीचे नमुने घेतले नसल्याचे सा.क्र.२ यांनी मान्य केले आहे. त्यामुळे वैद्यकीय पुराव्याअभावी आरोपीने अंमली

पदार्थाचे सेवन केल्याचे सिद्ध होत नाही. पंच परवेझ काझी व देवा धाडवे हे नेहमीचे (Stock witnesses) असल्याचे सर्व साक्षीदारांनी मान्य केले आहे. स्वतंत्र पंचांचा अभाव व मुद्देमालाची बेकायदेशीर विल्हेवाट यामुळे अभियोग पक्षाचा खटला पूर्णपणे संशयास्पद झाला आहे.

७. मा. उच्च न्यायालयाचे पत्र क्र. B(Gen)–1001/2026/223 दि. १८.०२.२०२६ अन्वये दि. ०९.०३.२०२६ ते १३.०३.२०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५६ व २५८ अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणात प्रमुख साक्षीदारांचे पुरावे नोंदवले गेले आहेत व त्यावरून आरोपीविरुद्ध कोणताही गुन्हा निष्पन्न होत नसल्याचे स्पष्ट आहे. पुराव्याअभावी खटला पुढे चालवण्यात काहीही अर्थ नाही. सबब, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५८ मध्ये दिलेल्या अधिकाराचा वापर करून पुढील कार्यवाही थांबवून आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरेल. सबब मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये आरोपी **अनारूल जाफर अली** याची एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क) सह २७ अंतर्गत असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा जामीन व मुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विशेष मोहिमेअंतर्गत हे प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.

SANTOSH PUNDLIKRAO WANKHADE

Digitally signed by SANTOSH PUNDLIKRAO WANKHADE
Date: 2026.03.16 12:04:36 +0530

स्थळ :– उरण

दिनांक :– १२.०३.२०२६

( एस. पी. वानखडे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायलय क्र. २ उरण